बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादकः बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | शनिवार, दि.९नोव्हेंबर २०२४ | वर्षे४रे | अंक९३वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३



# भाजपच्या 'बटेंगे'ला काँग्रेसचे 'जुडेंगे'!

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी
बटेंगे तो कटेंगे' या उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या घोषणेवर राज्याच्या निवडणूक प्रचारात जोर देऊन भाजपने मतांच्या ध्रुवीकरणावर भर दिला असतानाच काँग्रेसने 'जुडेंगे तो जितेंगे'या उत्तर प्रदेशमध्ये लोकप्रिय ठरलेल्या घोषणेने प्रत्युत्तर दिले आहे. 'बटेंगे विरुद्ध जुडेंगे' ही हिंदी पट्ट्यातील घोषणा राज्याच्या निवडणूक प्रचाराच्या केंद्रस्थानी आली आहे.उत्तर प्रदेशामधील विधानसभेच्या नऊ जागांसाठी होणाऱ्या पोटनिवडणुकीत मतांच्या ध्रुवीकरणाकरिता मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी 'बटेंगे तो कटेंगे' हा नारा दिला आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपला उत्तर प्रदेशात मोठा फटका बसला. विधानसभेच्या पोटनिवडणुकीतही त्याचीच पुनरावृत्ती होऊ नये म्हणून आदित्यनाथ यांनी मतांच्या ध्रुवीकरणावर भर दिला आहे. 'बटेंगे तो कटेंगे' या घोषणेला समाजवादी पार्टीने 'जुडेंगे तो जितेंगे' प्रत्युत्तर दिले आहे. तर 'जुडेंगे तो आगे बढेंगे' असे प्रत्युत्तर बसपाच्या सर्वेसर्वा मायावती यांनी दिले आहे.

## सत्ताकारणः भाजपकडून मतांचे ध्रुवीकरण

राज्यातील निवडणूक प्रचारात योगी आदित्यनाथ यांनी या 'बटेंगे तो कटेंगे'चा नारा दिला आहे. योगींच्या दौऱ्यानिमित्त मुंबईसह राज्यातील विविध शहरांमध्ये या घोषणेचे फलक मोठ्या प्रमाणावर लावण्यात आले आहेत. भाजपकडून वातावरणनिर्मितीसाठी या घोषणेचा वापर केला जात असतानाच काँग्रेसच्या वतीने 'जुडेंगे तो जितेंगे'ने प्रत्युत्तर दिले जाईल, असे छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल यांनी नागपूरमध्ये पत्रकार परिषदेत सांगितले. 'बटेंगे तो कटेंगे' याचा अर्थ मतांचे विभाजन झाल्यास पराभव अटळ, असा युक्तिवाद भाजपकडून करण्यात येत आहे. अल्पसंख्याकांचे एकगठ्ठा मतदान होते. त्यावर बुहसंख्यांच्या मतांचे विभाजन होऊ नये, अशी योगी आदित्यनाथ यांची भूमिका असल्याचे सांगितले जाते.मात्र, बटेंगे विरुद्ध जुडेंगे या हिंदी पट्ट्यातील घोषणा राज्यातील मतदारांना कितपत प्रभावित करतील याबाबत साशंकताच आहे.

### समान कार्यक्रमांतर्गत महायुतीतअजित पवार

'भाजपबरोबर महायुतीमध्ये समान कार्यक्रमांतर्गत आहोत. राज्याचा विकास व्हावा, यासाठी महायुतीमध्ये सहभागी झालो आहोत,' अशी भूमिका भाजपच्या 'बटेंगे तो कटेंगे' या संदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मांडली.

# परळीत आज शरद पवारांची सभा

आवाहनः बहादुरभाई, लुगडे, ॲड. देशमुख, पालीवाल, विभुते





परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी
परळी विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार, काँग्रेस, शिवसेना उबाटा प्रणित महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष देशाचे मा.कृषी मंत्री खा. शरद पवार यांच्या जाहीर सभेचे परळीत आज दि.९ नोव्हेंबर २०२४ रोजी आयोजन करण्यात आले आहे. या विराट सभेस महाविकास आघाडीच्या सर्व पदाधिकारी कार्यकर्ते तसेच परळी विधानसभा मतदारसंघातील मतदार बंधू भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन काँग्रेसचे शहराध्यक्ष सय्यद हनीफ सय्यद करीम उर्फ बहादुर भाई, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे परळी तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज, शहराध्यक्ष ड.जीवनराव देशमुख, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे परळी तालुका प्रमुख भोजराज पालीवाल, शहराध्यक्ष राजेश विभुते यांनी प्रसिद्धी पत्रकारद्वारे केले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष देशाचे मा. कृषिमंत्री खा. शरद पवार यांची ९ नोव्हेंबर रोजी परळी शहरातील मोंढा मैदान येथे दुपारी १ वा. जाहीर सभा होणार आहे. महाविकास आघाडीचे बळी विधानसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या प्रचारार्थ होणाऱ्या जाहीर सभेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासह पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा महिला आघाडी खा.फौजिया खान, बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संदीप क्षीरसागर, परळी विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार राजेसाहेब देशमुख, केज विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांच्यासह पक्षाचे नेते, पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. परळी शहरात होणाऱ्या या सभेसाठी परळी विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्ष, काँग्रेस व मित्र पक्षांच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी तसेच परळी विधानसभा मतदारसंघातील मतदार बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन काँग्रेसचे शहराध्यक्ष सय्यद हनीफ सय्यद करीम उर्फ बहादुर भाई, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे परळी तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज, शहराध्यक्ष ड. जीवनराव देशमुख, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे परळी तालुका प्रमुख भोजराज पालीवाल, शहराध्यक्ष राजेश विभुते यांनी एका प्रसिद्धी पत्रकारद्वारे केले आहे.

# उल्हासनगर येथे जोरदार सभा

महायुतीत चैतन्यः पंकजा मुंडे यांची प्रचार सभा



मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी
भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ.पंकजाताई मुंडे यांनी गुरुवारी उल्हासनगर टाऊन हॉल येथे उल्हासनगरचे भाजपचे उमेदवार कुमार आयलानी यांच्या प्रचारार्थ जाहीर सभेला संबोधित केले. पंकजाताई मुंडे यांच्या दमदार भाषणाने लोकांमध्ये उत्साह व स्फूर्ती निर्माण झाली. या सभेने उल्हासनगरात महायुतीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांत चैतन्य निर्माण झाले.

यावेळी भाजप महायुतीचे अधिकृत उमेदवार कुमार आयलानी, जीवन इदनानी, प्रमोद हिंदुराव, प्रमोद ताले, प्रदीप रामचंदानी, जमनू पुरस्वानी, मीना आयलानी, महेश सुखरामानी, मनोहर खेमचंदानी, अरुण आशान, किरण सोनवणे, नाना बागुल, प्रमोद ताले, मीना कोरटी, प्रमोद ताले. पाटील, नरेंद्र राजानी, भाऊ गोंधळे,भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, आरपीआय (आठवले), पीआरपी (कवाडे), साई पार्टी आणि लाल पंजाबीसह इतर मित्र पक्षांचे नेते, पदाधिकारी उपस्थित होते. महायुतीच्या या विशाल मेळाव्याला भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी संबोधित केले.यावेळी पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, जेव्हा त्यांचे वडील लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब पहिल्यांदा उल्हासनगरात आले, तेव्हा त्यांनी भाजप सरकार सत्तेवर

पान २ वर...

# प्रचार फेरीस नागरिकांचा प्रतिसाद

पडघमः परळीत धनंजय मुंडेच, अबाल वृद्धांचा विश्वास

परळी/ पुण्यभूमी प्रतिनिधी
परळी विधानसभा निवडणुकीतील राष्ट्रवादी काँग्रेस व महायुतीचे अधिकृत उमेदवार धनंजय मुंडे यांच्या प्रचारार्थ परळी शहरातील महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आज दुसऱ्या दिवशी काढलेल्या प्रचार फेरीसही नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. परळीच्या आपल्या हक्काच्या माणसाला निवडून द्यायचे... बाहेरचा कशाला? आजच्या प्रचार फेरीत एका वयोवृद्ध महिला मतदाराने आपली भावना व्यक्त केली.



अबाल-वृद्ध नागरिकांमध्ये परळीत अशा चर्चा असून, आता फक्त धनंजय मुंडेच! असा निर्धार शहरातील मतदारांनी केल्याचे दिसून येत आहे.

पान २ वर...

# तलवाडा पोलिसांचा हातभट्टी अड्ड्यावर छापा

कारवाईःमद्यपी, विक्रेत्यांची झाली एकच पळापळ



तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी
विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अवैध धंदे नियंत्रण आणण्यासाठी, त्याचप्रमाणे गुंडगिरी, दारूगिरी यावर नियंत्रण करण्यासाठी तलवाडा पोलिस सतत कारवाया करत आहे. दिं.८/११/२०२४ रोजी शुक्रवारी आज सकाळी तलवाडा येथील अंबिका नगर सपोनि सोमनाथ नरके यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक स्वापनिल कोळी, बीट अंमलदार काकडे, पोलीस कॉन्स्टेबल भरत गायकवाड, गोपनीय शाखेचे विठ्ठल चव्हाण,यांनी अंबिका नगर भागातील हातभट्टी अड्ड्यावर छापा मारला. असता एका प्लॅस्टिक ड्रम मध्ये हातभट्टीची तयार दारू वीस लिटर याची प्रतिलिटर विक्री किंमत शंभर रुपये प्रमाणे असे एकूण २००० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त तसेच गावठी हातभट्टीची

पान २ वर...

# खोतांनी तोंड सांभाळून बोलावे

राजेभाऊ फड :बेताल वक्तव्याचा केला निषेध

परळी/ पुण्यभूमी प्रतिनिधी
शरदचंद्र पवार साहेब हे देशाचे ज्येष्ठ आणि अभ्यासू नेते आहेत. राजकारणातील एक आदर्श व्यक्तिमत्व म्हणून त्यांचेकडे पाहिले जाते. विरोधक सुद्धा त्यांच्याकडून अनेक विषयांवर महत्त्वपूर्ण सल्ला घेत असतात. त्यांचा मानसन्मान करतात मात्र सदाभाऊ खोत यांच्यासारखे अस्तित्व शून्य झालेल्या लोकांचे भान सुटल्यासारखे दिसत आहे. शरदचंद्र पवार यांच्यावर सदाभाऊ खोत यांनी केलेले बेताल वक्तव्य त्यांची वैचारिक पातळी खालवल्याचे द्योतक असून त्यांच्या वक्तव्याचा जाहीर निषेध करत आहोत. पवार साहेबांसारख्या उत्तुंग व्यक्तिमत्वावर बोलत असताना त्यांनी तोंड सांभाळून व तारतम्य ठेऊन बोलावे असे प्रतिपादन युवक नेते राजेभाऊ फड यांनी केले आहे.

पान २ वर...



## प्रचारात आघाडी | मयुरीताई बाळासाहेब मस्के-खेडकरांचे आवाहन

# यंदा परिवर्तन अटळ, जनतेने साथ द्यावी



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी
आम्ही विस्थापित कुटुंबातली साधी आणि सरळ माणस आहोत. राजकारण करत असताना सामान्य माणसांचे प्रश्न त्यांच्या अडीअडचणी सोडविणे हा आमच्या राजकारणाचा केंद्रबिंदू राहिलेला आहे.

आम्ही पंडित-पवारांसारखे कपटी राजकारण करत नाहीत. या दोन्ही घराण्याने १९६२ पासून गेवराई मतदार संघात नवीन चेहरा निर्माण होऊ दिलेला नाही. जर कोणी त्यांच्या विरोधात बंड उठविण्याचे काम केले तर त्यांच्यावर खोट्या केसेस करून,बाधा निर्माण करण्याचे काम पंडित-पवार कुटुंबीय करत आलेले आहेत. तसेच १९६२ पासून ते आज तगायात गेवराई मतदार संघाचा म्हणावा तेवढा विकास झालेला दिसून येत नाही. तालुक्यात शेतकऱ्यांचे प्रश्न, बेरोजगारीचे प्रश्न, दळणवळण, शेतकऱ्यांच्या उसाला योग्य हमीभाव असे अनेक प्रश्न आजही सुटलेले नाहीत. त्यामुळे एका नवीन महिला चेहऱ्याला संधी देऊन गेवराई मतदार संघात इतिहास घडवून आणावा असं आवाहन प्रचारादरम्यान महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या उमेदवार मयुरीताई बाळासाहेब मस्के-खेडकर यांनी केले.

गेवराई विधानसभा मतदार संघात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून रेल्वे इंजिन या चिन्हावर मयुरीताई मस्के-खेडकर निवडणूक लढवीत आहेत. गेवराई मतदार संघातील जनतेशी संवाद साधत असताना त्या म्हणाल्या की, गेवराईच्या इतिहासात पहिल्यांदाच पंडित-पवार यांच्या विरोधात एक सक्षम पर्याय माझ्या

### एक सक्षम पर्याय...

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या गेवराई विधानसभेच्या अधिकृत उमेदवार मयुरीताई बाळासाहेब मस्के-खेडकर यांनी प्रचारात आघाडी घेतली असून पंडित पवारांच्या विरोधात एक सक्षम पर्याय म्हणून गेवराईची जनता त्यांच्याकडे पाहत आहे. त्यामुळे यंदा पंडित-पवार कुटुंबाचे राजकारण संपुष्टात येणार आहे. गेवराईच्या जनतेने तसा निश्चय केला तर निश्चितच पंडित-पवार राजकारणातून हद्दपार झाल्याशिवाय राहणार नाहीत. असा खरपूस समाचार मनसे उमेदवार मयुरीताई बाळासाहेब मस्के-खेडकर यांनी पंडित-पवारांचे नाव न घेता बोलून दाखविला.

# घराणेशाहीला आव्हाने देणाऱ्यावर हल्ले!

अजय सरवदेःओबीसी नेते लक्ष्मण हाकेंवरील हल्ल्याचा निषेध

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी
नांदेड जिल्ह्यात प्रचारासाठी दौऱ्यावर असताना ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांच्या गाडीवर भ्याड हल्ला करण्यात आला. आम्ही या हल्ल्याचा तीव्र निषेध बीड जिल्ह्याच्या वतीने करत आहोत. विधानसभा निवडणुकीत मराठा खाणावळीच्या एकजातीय घराणेशाहीला आव्हान देणाऱ्यांना जर अशाप्रकारे हिंसक हल्ले करून रोखण्याचा प्रयत्न होणार असेल तर वंचित बहुजन आघाडी हे कदापि सहन करणार नाही. सर्वसामान्य ओबीसी बांधवांच्या हक्काचं रक्षण करण्यासाठी आणि एससी, एसटी, ओबीसी आरक्षण वाचविण्यासाठी वंचित बहुजन आघाडी कटीबद्ध आहे. प्रस्थापित



मराठा नेतृत्वाच्या घराणेशाहीच्या सत्तेला आव्हान निर्माण झाल्यामुळे ते बिथरले आहेत. महाविकास

पान २ वर...

## अनर्थामागील अर्थ!

अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीतील डोनाल्ड ट्रम्प यांच्या विजयाचे आणि त्यापेक्षाही अधिक कमला हॅरिस यांच्या पराजयाचे कवित्व आणखी बराच काळ राहील. या निकालाचे वेगवेगळे अन्वयार्थ काढले जात असून तेही आणखी काही काळ सुरू राहील. तसे होणे नैसर्गिक. ट्रम्प यांच्यासारखी अ–लोकशाहीवादी, बेमुर्वतखोर आणि सर्व व्यवस्थांना खुंटीवर टांगणारी व्यक्ती जेव्हा प्रामाणिक लोकशाहीवादी, मुर्वतखोर आणि व्यवस्थांचा आदर करणाऱ्या देशात सर्वोच्च सत्तापदी निवडून येते तेव्हा सर्वांचे सैरभैर होणे नैसर्गिक ठरते. त्यातही पराभव झाला म्हणून समर्थकांस चेतवून कॅपिटॉल हिलवर हल्ला करण्यापर्यंत ज्याची मजल गेली आणि माध्यमांतील खोटेपणासाठी ज्यास दंड झाला असा इसम परत अध्यक्षपदी निवडून द्यावा असे अमेरिकी जनतेस वाटलेच कसे, या प्रश्नाचा भुंगा अनेकांच्या डोक्यात प्रदीर्घ काळ घोंघावत राहणे हेही नैसर्गिक. अशा अवस्थेत आपणास हव्या त्या उमेदवाराच्या पराजयाची आणि नको वाटत होता त्या उमेदवाराच्या विजयाची कारणे समोर मांडली जाणेही साहजिक. तरीही लोकशाही प्रक्रियेचा आदर करून ट्रम्प यांचा विजय सर्वांस गोड मानून घ्यावा लागेल. अशा वेळी 'हे' निवडून का आले यापेक्षा 'यांना' निवडून द्यावे असे जनतेस का वाटले नाही, या प्रश्नास भिडणे अधिक प्रामाणिकपणाचे ठरेल. कमला हॅरिस यांस जगातील अनेक सहिष्णू, उदारमतवादी अशा बुद्धिमंतांचा पाठिंबा होता. अनेक नामांकित, अभ्यासू माध्यमकर्मी, समूहांनी आपला कौल कमलाबाईंच्या बाजूने दिला होता. तरीही त्या हरल्या. तेव्हा या सगळ्याची कारणमीमांसा होणार आणि तशी ती व्हायलाही हवी. यातूनच इतरांस काही बोध मिळू शकतो. अर्थात तो घ्यावयाचा असेल तर. तेव्हा यातील पहिला मुद्दा म्हणजे कमला हॅरिस या हरल्याच कशा?

हा प्रश्न ''अयोध्येत भाजपचा पराभव झालाच कसा'', या प्रश्नाशी समांतर जातो आणि त्याचे उत्तरही त्या प्रश्नाच्या उत्तराशी समांतर आहे. कमला हॅरिस यांच्या पक्षाचे माजी राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांच्या वचनाचा आधार घ्यावयाचा झाल्यास या प्रश्नाचे उत्तर 'इट्स इकॉनॉमी, स्ट्युपिड' असे एका वाक्यात देता येईल. अर्थव्यवस्थेतील नाराजी ही राजकीय प्रक्रियेतून व्यक्त होते असा त्याचा अर्थ. यानंतर प्रश्न असा की जगातील सर्वात धनाढ्य देशातील नागरिकांस मुळात आर्थिक विवंचना भेडसावतात कशा आणि कोणत्या? अमेरिकेत सुदैवाने बेरोजगारीची समस्या नाही. तथापि चलनवाढीचे आव्हान मात्र तीव्र आहे. म्हणजे भाववाढ. हाती येणारे उत्पन्न तितकेच किंवा अत्यल्प वाढणार आणि त्याच वेळी याच उत्पन्नात भागवावयाचा खर्च मात्र वाढत जाणार असे हे वास्तव. वेतन स्तब्धता आणि त्याच वेळी खर्च मात्र वाढते ही परिस्थिती. उच्चवर्गीय, उच्चवर्णीय अभिजनवर्गास हे प्रश्न भेडसावत नाहीत. या प्रश्नाचा दाह ज्यांस हातातोंडाची गाठ घालणे जड जाते त्यांस अधिक कळतो. हा वर्ग मोठ्या प्रमाणावर कमलाबाईंच्या विरोधात गेला त्याचे हे कारण. अयोध्येत भव्य राम मंदिर आणि त्याभोवतीच्या परिसरासाठी अनेकांच्या पोटावर पाय आला, त्यांना विस्थापित व्हावे लागले आणि त्यांची ही वेदना मतपेट्यांतून व्यक्त झाल्यावरच इतरांस कळली. तसेच हे. अमेरिकेत माजी अध्यक्ष जॉर्ज बुश यांच्या काळात मध्यवर्ती बँकेचे गव्हर्नर ॲलन ग्रीनस्पॅन यांनी बाजारात मोठ्या प्रमाणावर पैसा ओतला. त्याचा इतका सुळसुळाट झाला की गरजशून्यांनाही कर्जे दिली गेली. त्यातून २००८ चे जागतिक आर्थिक संकट उद्भवले. बँकांचा लंबक दुसऱ्या दिशेला गेला. त्यातून आलेल्या नियमनातून अमेरिकी मध्यमवर्गाच्या पोटास चिमटा बसू लागला. हा वर्ग सत्ताधाऱ्यांवर नाराज होता. निवडणुकीत या वर्गास देण्यासाठी कमला हॅरिस यांच्याकडे काय होते? गर्भपात हक्क, समलैंगिकांस समान संधी आणि स्थलांतरितांस औदार्य इत्यादी. हे तीनही विषय अभिजनवादी वाटू शकतात हे नाकारणे अप्रामाणिकपणाचे ठरेल. यातील गर्भपाताचा हक्क आणि समलैंगिकांप्रति समानता हे वैयक्तिक जीवनशैलीसंबंधित मुद्दे आहेत. वैयक्तिकांना भेडसावणाऱ्या प्रश्नांची बरोबरी व्यापक समुदायासमोरील आव्हानाशी करणे अयोग्य. आपल्याकडेही हा प्रयत्न होतो. विशेषत: समलैंगिकांबाबत अधिक. गर्भपात करावयाचा की गर्भ वाढू द्यावयाचा हा सर्वस्वी संबंधित स्त्रीचा अधिकार. ज्यांना काहीही सहन करावे लागत नाही त्यांनी मातृत्वाच्या कथित उदात्ततेविषयी कढ खुशाल काढावेत. याबाबत दुमत नाही. पण अमेरिकेत अतिरेक झाला तो दुसऱ्या विषयाचा. भिन्नलिंगी, समलिंगी व्यक्तींस अन्यांइतकाच जगण्याचा अधिकार आहे आणि सर्वांस मिळणाऱ्या सेवांवर त्यांचाही तितकाच हक्क आहे, हे मान्य. त्यांना तो अधिकार मिळायलाच हवा आणि त्यासाठी अन्यांनी प्रयत्न करायला हवेत हेही मान्य. परंतु त्यांच्या या हक्कांचे पुरस्कर्ते त्याबाबत प्रचाराचा इतका अतिरेक करतात की भिन्नलिंगी लोकांस आपण समलिंगी नाही याबाबत गंड निर्माण व्हावा! पुरोगामित्वाचा अस्थानी अतिरेक हा प्रतिगामींस अधिक बळ देणारा असतो याचे मोठे उदाहरण भारताइतके अन्यत्र कोठेही नव्हते. या निवडणुकीने अमेरिकेस ते मिळाले. पुरोगामित्वाचा पुरस्कार करण्याआधी काहीएक किमान गरजा भागवण्याची हमी हवी. ती देण्यात हॅरिस नि:संशय कमी पडल्या. त्यामुळे हॅरिस यांचे पुरोगामित्व हेच सर्व समस्यांचे मूळ आहे हे ट्रम्प यांचे अतिरेकी कथानक अमेरिकी जनतेने सहज स्वीकारले.

# प्रयत्न केला तरी ते वाकडेच राहणार!




२०२४ अमेरिकन अध्यक्षीय निवडणूक ही अमेरिकेचा ४७ वा राष्ट्राध्यक्ष निवडण्यासाठीची निवडणूक होती . यात रिपब्लिकन पक्षाच्या डोनाल्ड ट्रम्प यांचा विजय झाला.या निवडणुकांत कोणत्याही पक्षास उमेदवार उभे करण्यास मुभा असली तरी मुख्यत्वे लढत डेमॉक्रॅटिक पक्ष आणि रिपब्लिकन पक्षाच्या उमेदवारांत खरी लढत होती. रिपब्लिकन पक्षाकडून माजी राष्ट्राध्यक्ष डॉनल्ड ट्रम्प पुन्हा मैदानात उभे होते.तर डेमोक्रॅटिक पक्षाकडून वर्तमान राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन उमेदवार होते मात्र २१ जुलै, २०२४ रोजी त्यांनी निवडणुकीतून माघार घेतली. त्यानंतर उपराष्ट्राध्यक्ष कमला हॅरिस यांनी उमेदवारी जाहीर केली. त्याला डेमोक्रॅटिक पक्षाने पाठिंबा दिला. रिपब्लिकन पक्ष आणि डोनाल्ड ट्रम्प पुन्हा सत्तेवर आले. रिपब्लिकन पक्ष हा अमेरिकेतील दोन महत्त्वाच्या राजकीय पक्षांपैकी एक पक्ष आहे . नुकत्याच झालेल्या निवडणुकीत पक्षाने अध्यक्षपद मिळवले.आपल्या आर्थिक व सामाजिक भूमिकांमुळे रिपब्लिकन पक्ष अमेरिकन राजकारणात उजवीकडे झुकणारा पक्ष मानला जातो.२०२० सालीच्या निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प यांना अमेरिकेच्या मतदारांनी घरचा रस्ता दाखवला आणि ज्यो बायडेन यांना अध्यक्षपदी बसवले.खर तर ज्यो बायडेन यांच्या पूर्वी म्हणजे २०१७ च्या निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प यांना अध्यक्षपदी निवडून दिले.नंतरच्या अध्यक्षीय निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प आणि ज्यो बायडेन यांच्यात अध्यक्षीय निवडणूक झाली.आता डोनाल्ड ट्रम्प यांचे संकुचित धोरण न पटल्यामुळे त्यांच्या जागी ज्यो बायडेन यांना संधी दिली ते संधीच सोनं करतील म्हणून त्यांना अध्यक्षपदी बसवले खरे पण डेमोक्रॅटिक पक्षाच्या आणि अमेरिकेच्या धोरणात ना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिणाम दिसून आला.त्यामुळे तळ्यात मळ्यात करणार्या मतदारांनी पुन्हा डोनाल्ड ट्रम्प यांना संधी दिली. विद्यमान अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर झालेला गोळीबार हा मुद्दा ही निवडणुकीत महत्वाचा ठरला गेला. खर तर डेमोक्रॅटिक पक्षाने कमला हॅरिस यांना २०२० च्या निवडणुकीत उमेदवारी दिली असती तर सलग डेमोक्रॅटिक पक्षाचा अध्यक्ष राहिला असता ही शक्यता नाकारता येत नाही. स्वतः ला सांभाळत न येणारा राष्ट्राध्यक्ष असेल तर महासत्तेच वलय राहिलं?हे गेल्या चार वर्षांत मतदारांनी अनुभवलं आहे. आधीच डेमोक्रॅटिक पक्षाचा अध्यक्ष करून चार वर्षे चाचपडत गेली. त्यामुळे पुढची चार वर्षे अशीच चाचपडत घालावण्यापेक्षा



पदमाकर उखळीकर,
मो.९९७५१८८९१२

संकुचित धोरण आपल्या तरी देशासाठी वाव मिळेल.हा विचार मतदारांनी केला असावा. अन्यथा कमला हॅरिस यांची विजयाची वाटचाल सुरवातीच्या टप्प्यातच दिसू लागली.पण, मतदारांनी पुन्हा रिक्स कशाला म्हणून पुन्हा डोनाल्ड कार्ड खेळल्याच दिसतं. डोनाल्ड ट्रम्प यांची भुमिका भलेही कुणाला पटणारी नसेल पण अमेरिकनांना ती पटणार नाही असे नसावे. सुधारणावादी विचारांपेक्षा मतदारांनी पुन्हा पुरातनवादी विचारधारा स्विकारली आहे. पुराणमतवादामध्ये पुरातन काळापासून चालत आलेल्या पारंपरिक प्रथा व संस्कृती जिवंत ठेवण्यासाठी डोनाल्ड ट्रम्प यांना संधी दिली आहे. ह्याउलट उदारमतवादामध्ये नवे विचार व संकल्पनांचा स्वीकार मतदारांनी नाकारला आहे .याला कारण डेमोक्रॅटिक पक्षाने निवडलेल्या बायडेन उमेदवार केले यांच्यावर रोष मतदारांचा होता. आजवरचे रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्षांची आजच्या सारखी संकुचित भुमिका राहिलेली नाही.हे विशेष सांगता येईल. पण, काही ना काही खुबी या रिपब्लिकन पक्षाच्या अध्यक्षपदी राहिलेल्या व्यक्तीस आहे.अब्राहम लिंकन, रिचर्ड निक्सन,जेराल्ड फोर्ड, वॉरेन हार्डिंग यांसारख्यांचा अध्यक्षपदाचा कार्यकाळ अमेरिकेलाही वेगळी ओळख करून गेला.आजवरचे रिपब्लिकन अध्यक्ष

अब्राहम लिंकन,युलिसिस एस. ग्रँट ,रदरफोर्ड बी. हेस, जेम्स गारफील्ड,चेस्टर ए. आर्थर, बेंजामिन हॅरिसन,विल्यम मॅककिन्ली,थियोडोर रूझवेल्ट, विल्यम हॉवार्ड टाफ्ट,वॉरेन हार्डिंग,कॅल्विन कूलिज,हर्बर्ट हूवर, ड्वाइट डी. आयझेनहॉवर, रिचर्ड निक्सन, जेराल्ड फोर्ड , रॉनल्ड रेगन,जॉर्ज एच.डब्ल्यू. बुश, जॉर्ज डब्ल्यू. बुश, डोनाल्ड ट्रम्प आणि आता विद्यमान राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प . अमेरिका फर्स्ट हे धोरण सुरवातीला राहिलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांचे कायम राहील हे अमेरिका म्हणून ठिक पण महासत्ता म्हणून जगातील युद्ध मानसिकता, जागाची आर्थिक चिंताजनक परिस्थिती, जागतिक तापमानवाढ याचे काय? डोनाल्ड ट्रम्प राष्ट्राध्यक्ष झाल्याचा आनंद पुराणमतवादी विचारांच्या राष्ट्रांना होईल.अमेरिकेला इतिहास घडवण्याची संधी चालून आली होती. कारण, पहिली महिला उदारमतवादी विचारसरणी निवडता आली असती.ती पुन्हा येईल सांगता येणार नाही.हे ही तितकेच खरे होते.डोनाल्ड ट्रम्प यांची भुमिका बदलते की,शेवटी शेपूट कितीही सरळ करण्याचा प्रयत्न केला तरी ते वाकडेच राहणार .

# अमेरिकेत माझे भविष्य कठीण

## ट्रम्प यांच्या विजयानंतर मस्क यांच्या तृतीयपंथी मुलीनं व्यक्त केली खंत

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

अमेरिकेत रिपब्लिकन पक्षाचे नेते डोनाल्ड ट्रम्प यांचा राष्ट्राध्यक्षपदी पुन्हा एकदा विजय झाला आहे. जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती असलेल्या एलॉन मस्क यांनी त्यांना जाहीर पाठिंबा दिला होता. ट्रम्प यांच्या विजयानंतर एलॉन मस्क यांनी आनंद साजरा केला. मात्र त्यांच्या तृतीयपंथी मुलीला हा विजय रुचलेला नाही. ट्रम्प यांच्या विजयामुळे आता अमेरिकेत माझे भवितव्य दिसत नाही, अशी खंत मस्क यांच्या तृतीयपंथी मुलीने व्यक्त केली आहे. २० वर्षीय व्हिव्हियन जेना विल्सन हिने वडील मस्क यांच्याशी २०२२ साली सर्व संबंध तोडले होते. आपले नाव आणि लिंग बदलण्यासाठी याचिका दाखल केल्यानंतर बाप–लेकाच्या संबंधात तणाव निर्माण झाला होता.व्हिव्हियन जेना विल्सनने थ्रेड्स या सोशल मिडिया साईटवर पोस्ट केली आहे. त्यात ती म्हणाली, मी याबाबत बराच विचार केला. पण काल मी निर्णयापर्यंत पोहोचले. मला आता अमेरिकेत माझे भवितव्य दिसत नाही. अमेरिकेत राष्ट्राध्यक्षपदाचा निकाल लागल्यानंतर व्हिव्हियनने ही पोस्ट केली आहे. आणखी एका पोस्टमध्ये तिने म्हटले, त्यांचा (ट्रम्प) कार्यकाळ जरी चार वर्षांचा आहे. या काळात ट्रान्स विरोधी नियम लागू होणार नाहीत. पण या कायद्याच्या विरोधात ज्यांनी मतदान केले, ते तर बदलणार नाहीत.



### कोण आहे व्हिव्हियन जेना विल्सन?

एलॉन मस्क यांची पहिली पत्नी जस्टीन विल्सन यांना सहा मुले आहेत. त्यापैकी व्हिव्हियन हा एक मुलगा होता. जेव्हा व्हिव्हियनने वडिलांपासून वेगळे होण्याचा निर्णय घेतला तेव्हा वडील मस्क यांच्यावर आरोप केला होता. त्यांनी मुलाचा लिंग परिवर्तन करण्याचा निर्णय स्वीकारला नाही, असे व्हिव्हियनने सांगितले होते.

### एलॉन मस्क यांनी काय म्हटले?

आपल्या मुलीच्या दाव्यावर मात्र मस्क यांनी नाराजी व्यक्त केली आहे. मस्क यांनी आपल्या मुलीबरोबर बिघडलेल्या संबंधांना उच्चभ्रू विद्यापीठे आणि शाळांमध्ये नव मार्क्सवाद्यांच्या प्रभावाला जबाबदार धरले. एका मुलाखतीत एलॉन मस्क यांन सांगितले की, सँटा मोनिका येथील शाळेत शिक्षण घेत असताना विल्सनवर प्रभाव टाकला गेला. वोक माईंड व्हायरसमुळे माझ्या मुलाचा खुन झाला, अशी टोकाची प्रतिक्रिया त्यांनी दिली होती.

# महेबुबभाई शेख यांच्या संवाद यात्रेला प्रतिसाद

म्हसोबावाडी/पुण्यभूमी प्रतिनिधी

आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा निवडणूक ही प्रेतेष्ठेची होत असून २३१ आष्टी मतदार संघाचे महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अधिकृत उमेदवार मा.श्री.महेबूबभाई इब्राहीम शेख यांच्या प्रचारार्थ ७ नोव्हेंबर २०२४ रोजी दौलावडगाव गटातील सावरगाव,शेडाळा,घाट देऊळगाव,लमणतांडा, चिचेवाडी,अरणविहरा हरेवाडी मराठवाडी बांदखेल केळ पिंपळगाव घाट कारखेल साले वडगाव अंभोरा इत्यादी सर्व गावांना गाव भेट संवाद द्वाराला जनतेतून चांगला प्रतिसाद मिळत असून सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्तीमत्व आणि सर्वसामान्य जनतेच्या मनातील माणूस म्हणून श्री महेबुब भाई शेख यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे.

ग्रामस्थांनी आदराने स्वागत केले हे सदैव स्मरणात राहील, आपल्या सर्वांचे सहकार्य असेच पाठशी राहुदेत, आपल्या समस्या सोडवण्यासाठी मी कटिबद्ध आहे. आष्टी – पाटोदा– शिरूर मतदारसंघाच्या शाश्वत विकासासाठी येत्या २० नोव्हेंबर रोजी 'तुतारी वाजवणारा माणूस' या चिन्हासमोरील बटण दाबून प्रचंड बहुमताने निवडून द्या असे आवाहन महेबुब भाई यांनी मतदारांना केले. यावेळी आष्टी तालुक्यातील श्री परमेश्वर काका शेळके तालुका अध्यक्ष, राष्ट्रवादी नेते श्री सुनील दादा नाथ, श्री रवींद्र ढोबळे राष्ट्रीय काँग्रेस पार्टी तालुका अध्यक्ष, श्री संदीप हाडे शिवसेना ता.उपप्रमुख, ज्ञानेश्वर मुटकुळे शिवसेना, श्री विजू गाढवे, राहुल काकडे,शौकत पठाण, रा.काँ.पा.आष्टी तालुका अध्यक्ष अल्पसंख्याक सेल, शिवाजी परभणे पाटील, सतीश चौधरी, ज्ञानेश्वर कासवत यांची प्रमुख उपस्थिती लाभली,दौलावडगावचे मा.सरपंच मेहमूद शेख,ग्राम.पं.सद्स.महादेव कोहक, सागर फसले,आसाराम कोहक, अरबाज खान, जालिंदर मुळे,ग्राम.पं.सदस्य मिरा मामु , गफार पटेल, पापामिया पटेल, मोईन खान,खंडू अप्पा इथापे, दादा टेलर,राजू फसले,नवाब शेठ,शौकत मेजर,जैनूद्दीन मेजर, इक्बाल मेजर , मोहसिन कुरेशी,प्रदीप पिसोरे, सचिन कोहक, रोहिदास आडबल्ले, पत्रकार बंधू जावेद सय्यद आदी मान्यवर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान एक वरून

**उल्हासनगर येथे जोरदार**

आल्यावर गुंडगिरीमुक्त शहर निर्माण करण्याचा संकल्प केला होता आणि त्यावर काम केले, त्याची सुरुवात उल्हासनगर पासूनच झाली. मुंडे साहेबांनी कुमार आयलानी यांना भाजपकडून पहिल्यांदा तिकीट दिले होते. नरेंद्र मोदींच्या रूपाने भारताला असा पंतप्रधान लाभला आहे ज्यांनी महिला शक्तीचे उदात्तीकरण केले.२०१४ पासून महिलांच्या स्थितीत बरीच सुधारणा झाली आहे. योजनां सोबतच मोदीजींनी महिलांना सन्मान देण्याचे काम केले आहे. तर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने राज्यातील जनतेच्या सक्षमीकरणासाठी अनेक योजना आणल्या आहेत. त्या दिशेने महाराष्ट्रात प्रयत्न सुरू आहेत.

**प्रचार फेरीस नागरिकांचा**

शहरातील पंचशील नगर,कंडक्टर कॉलनी, माधवबाग,लूंबीनी नगर,शारदा नगर,सोमेश्वर नगर,जलालपूर या भागात भव्य फेरी काढण्यात आली होती. यावेळी मतदार बंधू भगिनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत धनुभाऊंना सर्वाधिक मताधिक्य देवू हा विश्वास व्यक्त केला.प्रचार फेरीत राष्ट्रवादी,भाजप, शिवसेना,रि.पा.ई. व अन्य मित्र पक्ष महायुतीचे असंख्य पदाधिकारी–सहकारी उपस्थित होते.

**तलवाडा पोलिसांचा हातभट्टी**

दारू तयार करण्याचे रसायन एका लोखंडी बॅरल मध्ये १०० लिटर प्रति किंमत ३५ रुपये प्रमाणे ३५,०० ते रुपयांचा रसायन नष्ट करण्यात आला पोलिस अंमलदार नारायण श्रीकृष्ण काकडे यांच्या फिर्यादीवरून आरोपी मंगल तुकाराम चव्हाण रा. अंबिका नगर यांच्या विरोधात कलम ६५ ( ई ) (फ) म. महाराष्ट्र दारू बंदी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**खोतांनी तोंड सांभाळून**

एका प्रचार सभेत बोलत असताना सदाभाऊ खोत यांची जीभ घसरली. शरदचंद्र पवार यांच्यावर टीका करत असताना त्यांनी एकेरी भाषा वापरली. त्यांनी केलेले विधान अत्यंत निंदनीय आहे. खोतांच्या वक्तव्यावर अनेक बड्या नेत्यांनी नाराजी व्यक्त केली असून, पवार साहेबांसारख्या उत्तुंग व्यक्तिमत्वावर बोलत असताना जरा तारतम्य ठेऊन बोलण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सदाभाऊ खोत यांच्यासारख्या बेताल वाचाळवीर लोकांमुळे राजकारणाची पातळी अत्यंत खालावत आहे. भान गेल्याप्रमाने त्यांनी बोलतांना हजार वेळा विचार करून बोलले पाहिजे. राजकीय विरोध म्हणून बोलत असताना कोणावरही वयक्तिक खालच्या पातळीवर टीका करता कामा नये. त्यांनी तोंड सांभाळून बोलावे व केलेल्या वक्तव्याबद्दल शरदचंद्र पवार यांची जाहीर माफी मागावी अन्यथा त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतील असा इशारा युवक नेते राजेभाऊ फड यांनी दिला आहे.

**घराणेशाहीला आव्हाने**

आघाडी आणि महायुती या मराठा खानावळ आहेत. या मराठा खानावळीनेच आपल्या हस्तकांच्या माध्यमातून लक्ष्मण हाकेवर हल्ला केला आहे. असे हल्ले घडवून राज्यात दहशतीचं वातावरण निर्माण केलं जात आहे. वंचित बहुजन आघाडी ही दहशत बिलकुल खपवून घेणार नाही.वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आम्ही आज जाहीर करीत आहोत की, महाराष्ट्रात ओबीसी नेत्यांवर पुन्हा असे भ्याड हल्ले केले तर जशास तसं उत्तर देण्यात येईल हल्ला करणाऱ्यांच्या नेत्यांना आम्ही जिल्ह्यात फिरू देणार नाही असा इशारा वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी दिला आहे.

**यंदा परिवर्तन अटळ**

रूपाने निर्माण झाला आहे. गेल्या ६२ वर्षापासून गेवराईचे राजकारण प्रस्थापित पंडित–पवार यांच्या भोवतीच घिरट्या घालत आहे.गेवराईच्या जनतेला अनादी काळापासून फसविण्याचे काम या दोन कुटुंबांकडून होत आले आहे. पंचायत समिती, जिल्हा परिषद, विधानसभा, लोकसभा या सर्वच निवडणुकीत महत्त्वाची पदे आपल्याकडे कशी राहतील यासाठी धडपड करताना दिसून येतात. एवढंच नव्हे तर राज्याच्या राजकारणातले प्रस्थापित पक्ष देखील याच लोकांना पुन्हा पुन्हा संधी देतात, कारण प्रत्येक जण एकमेकांचा पाहुणा आहे. त्यामुळे आपल्यासारख्या विस्थापित लोकांना संधी मिळणे मोठी कठीण बाब आहे. अनेक संकटे झेलून, आम्ही आज तुमच्यासमोर उमेदवार म्हणून उभा आहोत, ही संधी पुन्हा नाही. त्यामुळे मायबाप जनतेने तुमची लेक समजून या निवडणुकीत माझ्या पाठीशी खंबीरपणाने उभे राहून मतदानरुपी आशीर्वाद द्यावेत. असे आवाहन गेवराई विधानसभेच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या अधिकृत उमेदवार मयुरीताई बाळासाहेब मस्के–खेडकर यांनी प्रचार दौऱ्यात नागरिकांशी संवाद साधत असताना केले.यावेळी मयुरीताई मस्के–खेडकर असंही म्हणाल्या की, केवळ निवडणूक आली म्हणून आम्ही निवडणुकीत उतरलो नाहीत.गेवराई मतदार संघात आमचे सामाजिक कार्य अविरतपणे सुरू आहे. आम्ही अनेकांच्या डोळ्यांच्या मोफत शस्त्रक्रिया करून त्यांना दृष्टी देण्याचे काम केले. कोरोना सारख्या महामारीत एक व्यापक मदतीची मोहीम हाती घेऊन जनतेच्या सोबत खंबीरपणे उभा राहिलो आहोत.आमचे कुटुंब सतत जनतेच्या सेवेत उपलब्ध राहिलेले आहे. त्यामुळे गेवराई मतदार संघातील मतदार बांधवांनी आपल्याला सेवा करण्याची संधी द्यावी असे आवाहन मयुरीताई बाळासाहेब मस्के–खेडकर यांनी केले.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**

हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# सत्ता भोगी क्षीरसागरांना घरचा रस्ता दाखवा!

## पडघम — अनिल दादा जगतापांचा प्रचार दौऱ्यात सुरेश नवले गरजले

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेली अनेक वर्ष सत्ता भोगून क्षीरसागरांना केवळ बीडकरांच्या विश्वासाचा घात करत स्वतःचे घरं भरण्याचे काम केले आहे आणि बीडकरांना विकास तर सोडाच पण मूलभूत गरजांपासून वंचित ठेवण्याचे महापाप केले आहे. सत्तेचा ताम्रपट घेऊन क्षीरसागरांच्या पिढ्यानुपिढ्या बीडवर आपली मक्तेदारी चालवत आल्या आहेत व बीड विकासाचा खेळखंडोबा करत आहेत. मात्र क्षीरसागरांच्या पापांचा घडा भरला असून सामान्य घरातील बीड विधानसभेचे अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांच्या पाठीशी शहर-ग्रामीण भागातील मतदार मोठ्या ताकदीने उभा राहिला असल्याचे माहिती माजी राज्यमंत्री प्रा. सुरेश नवले यांनी दिली आहे.

काल दि. ७ नोव्हेंबर रोजी सकाळपासून बीड विधानसभेचे उमेदवार मा. अनिलदादा जगताप यांनी बीड मतदार संघातील चौसाळा जिल्हा परिषद गट पिंजून काढला असून वानगाव, गोगलवाडी, रौळसगाव, खडकी घाट, चांदेगाव, देवीबाभळगाव, जेबापिंप्री, पालसिंगण, हिंगणी खु., हिंगणी बु., रूईगव्हाण / माळेवाडी, मानेवाडी, पिंपळगाव घाट, वाढवणा, चौसाळा या सर्व गावात जाऊन कॉर्नर बैठका घेत ग्रामस्थांच्या गाठीभेटी घेतल्या. तसेच त्यांच्याशी मुक्त संवाद साधला व त्यांच्या समस्या जाणून घेत त्यांना अनुक्रमांक १३ चिन्ह शिवण यंत्र यावर बटन दाबून प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन केले. दरम्यान शहर आणि ग्रामीण भागातील मतदारांनी सुद्धा यंदाच्या निवडणुकीत अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांना निवडून देण्याचा निर्धार केला आहे. याप्रसंगी अनिलदादा जगताप यांच्यासोबत सहकारी कार्यकर्ते समर्थक मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. सर्वच गावात ठीकठिकाणी अनिलदादा जगताप आणि प्रा सुरेश नवले यांचा हृदय सत्कार करून मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले.




### मला एकदा संधी द्या: अनिलदादा जगताप

काल रोजी माजी राज्य मंत्री प्रा सुरेश नवले यांच्यासह बीड विधानसभा अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांनी शहर आणि ग्रामीण भागात कॉर्नर बैठका घेऊन ग्रामस्थांच्या गाठीभेटी घेतल्या. यादरम्यान अनिलदादांनी मतदारांना बीडच्या सर्वांगीण विकासाठी मला एकदा संधी द्या. मी आपल्या अपेक्षेप्रमाणे बीडकरांच्या मूलभूत गरजा पूर्ण करून बीडच्या विकासाचा कायापालाट करून दाखवेल फक्त मतदानरुपी मला एकदा आशीर्वाद द्या अशी विनंती करत अहवान केले.

# बीडमध्ये शरद पवारांची सभा

## पत्रक : सुनिल नाथ, ॲड, रिजवान शेख



कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

आष्टी विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार महेबुब शेख यांच्या प्रचारार्थ आज शनिवार दि ९ नोव्हेंबर रोजी दुपारी २ वाजता आष्टीत माजी केंद्रीय मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांची जाहीर सभा होणार आहे. या सभेस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन आष्टी राष्ट्रवादीचे नेते सुनिल नाथ, ॲड रिजवान शेख यांनी केले आहे.

बहूचर्चित आष्टी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार महेबुब शेख यांनी आष्टी विधानसभा मतदारसंघ पिंजून काढला असून सर्वसामान्य नागरिकांतून त्यांना उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत असून, जनतेनेच ही निवडणूक हातात घेतली आहे. त्यामुळे संयमी व्यक्तिमत्व असलंले महेबुब शेख यांचा विजय निश्चित झाला आहे. त्यांच्या प्रचारार्थ माजी केंद्रीय कृषिमंत्री तथा राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांची आष्टी येथे शनिवारी दुपारी २ वाजता जाहीर सभा होणार आहे. आष्टी विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी, सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, कष्टकरी, युवक तसेच कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे. असे आवाहन आष्टीचे राष्ट्रवादीचे नेते सुनिल नाथ, ॲड रिजवान शेख, पाटोद्याचे शिवभूषण जाधव, शिरूरचे तालुकाध्यक्ष दिपक खोले यांनी केले आहे.

# मुंदडाचे शिक्षक आचारसंहितेत करताहेत प्रचार ?

## बोंबला: कारवाई करण्याची होतेय मागणी

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज अंबाजोगाई मतदार संघाच्या भाजप उमेदवार नमीता मुंदडा यांचा प्रचार शिक्षक करतात व चिंचोली माळी येथील कर्मवीर विद्यालयाचे सचीव, संस्थाचालक सुध्दा प्रचार करताना दीसुन येत आहेत तरी शासनाने विद्यापीठ व सलंग्नित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी राजकीय पक्षाच्या निवडणूक प्रचार कामात प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष सहभाग घेतल्यास त्यांच्या विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करावी, असे निर्देश उच्च शिक्षण विभागाने सर्व विद्यापीठ, महाविद्यालय व शैक्षणिक संस्थांना दिले आहेत. राज्यात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. त्यानुसार आचारसंहिता नियमाचे पालन करण्याबाबतचे विविध प्रकारचे निर्देश निवडणूक आयोगाकडून देण्यात आले आहेत. तसेच, राज्यातील विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेतर अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी सामाईक परिनियम अस्तित्वात येईपर्यंत महाराष्ट्र नागरीसेवा नियमातील तरतुदी लागू करण्यात आल्या आहेत. त्यानुसार कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याला कोणत्याही राजकीय पक्षाचा किंवा राजकारणात भाग घेणाऱ्याय कोणत्याही संघटनेचा सदस्य होता येणार नाही. तसेच, त्यांच्याशी संबंध ठेवता येणार नाही किंवा कोणत्याही राजकीय चळवळीत किंवा कार्यात कोणत्याही प्रकारे भाग घेता येणार नाही अथवा सहाय्य करता येणार नाही असे असताना मुंदडाच्या शाळेतील शिक्षक तसेच चिंचोली माळी येथील कर्मवीर विद्यालयाचे सचीव, संस्थाचालक, शिक्षक भाजप उमेदवार नमीता मुंदडा यांचा प्रचार करताना दीसुन येत आहेत तरी निवडणूक आयोगाने शिक्षक,सचीव, संस्थाचालक यांच्या वर कारवाई करण्यात यावी असे नागरिकांन कडुन बोलले जात आहे भावना व्यक्त केल्या जात आहेत.

# लोणारमध्ये सात फूट लांबीचा अजगर

## निसर्ग:सर्पमित्रांनी दिले जीवदान



लोणार/पुण्यभूमी प्रतिनिधी

लोणार जवळच पिंपळनेर येथील शेतकरी सचिन सानंप यांच्या शेताच्या गोठ्याजवळ यांना सायंकाळी ८:०० च्या सुमारास भला मोठा अजगर दिसला. त्यांनी 'मी लोणारकर' टीम चे सर्पमित्र सचिन कापुरे, याना याची माहिती दिली तत्काळ त्यानी निसर्ग मल्टिपर्पज फाउंडेशन चे सर्पमित्र ज्यांना सापांचा ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव आहे असे विनय कुलकर्णी व सर्पमित्र कमलेश आगरकर यांच्या मदतीने अजगर या मोठ्या सापाला रेस्क्यू केलं.

दुर्मिळ असलेल्या या अजगराला इंडियन रॉक पायथॉन म्हणून ओळखलं जातं.हे अजगर सहसा पाण्याच्या ठिकाणी आढळून येतात. त्यांना उत्तम पोहता येते. २०१०-२०२० या दशकामध्ये अधिशोषण, अधिवास नष्ट होणे आणि अपुरे संवर्धन यांमुळे भारतीय अजगरांची संख्या सु. ३०% इतकी कमी झाल्याची आढळून आली. त्यामुळे इंटरनॅशनल युनियन फॉर कन्झर्वेशन ऑफ नेचर (खणउछ) या संस्थेने नजीकच्या काळात ही जाती धोक्यात येऊ शकते (छ्शरी ींहीशरींशपशव), असे जाहीर केले आहे. संकटग्रस्त यादीत अजगर आहे याचे आयुर्मान सु. ३० वर्षे असते.हा सर्वांत मोठा बिनविषारी सर्प (साप) आहे. गवताळ प्रदेश, घनदाट जंगले, खडकाळ प्रदेश, वाळवंटी प्रदेश, दलदलीयुक्त प्रदेश, नदी-तलाव यांसारखे पाण्याचे प्रवाह असलेल्या जागा अशा विविध अधिवासात अजगर आढळतात.या सापाची लांबी ७ फूट व वजन १०.२५ किलो आहे या अजगराला रेस्क्यू करून त्याच्या नैसर्गिक अधिवासात वनविभागला कळऊन सोडण्यात आले या वेळी सर्पमित्र बंटी नरवाडे, कमलेश आगरकर , सचिन कापुरे, उमेश चिपडे, विलास जाधव, विशाल वर्मा, विलास खरात, ऋतिक सुसर, चंदू अंभोरे व इतर सर्पमित्र तसेच वैन विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

# जनविकास आघाडीला पडला विसर?

## सवाल: निवडणुकी पुरते जरांगे पाटील आठवलेका

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज अंबाजोगाई मतदार संघात मराठा योध्दे मनोज जरांगे पाटील यांचे समर्थक म्हणून मिरवलेल्या व अपक्ष उमेदवार म्हणून मिरवलेल्या व आम्ही जरांगे पाटील यांच्या कडुन निवडणूक लढवणार म्हणाऱ्या जनविकास परिवर्तन आघाडीला मराठा योध्दे मनोज जरांगे पाटील यांचा विसर एवढ्या लवकर कसा पडला असा प्रश्न नागरिकांना पडला आहे कारण निवडणूक लागण्या अगोदर कुठल्याही उपोषणात न जमकणारे नेते व नगराध्यक्षा निवडणूक लागली की जरांगे पाटील समर्थक म्हणून मिरवल्या व नंतर मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणुकीतुन माघार घेतली की जनविकास आघाडीच्या प्रमुख कार्यकर्त्यांच्या बैठकच्या जाहिरातीवर फिलेक्स वरुन जरांगे पाटील यांचा फोटो का काढला आस प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे कारण जरांगे पाटील यांनी फक्त निवडणूकीतुन माघार घेतली आहे आरक्षनाचा लढा चालूच आहे मग जनविकास आघाडीला मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांची व मराठा समाजाचा निवडणूकी पुरती आठवण झाली होती का व जनविकास आघाडीला मराठा समाजाला आरक्षण मिळावे अशी इच्छा नाही का असा ही प्रश्न नागरिकांना पडला आहे नागरिकांन मधुन भावना व्यक्त केल्या जात आहेत.

# नमिता लोखंडे लोकसभेत कुठे होता?

## पडघम: केजची जनता विचारु लागली प्रश्न




केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज विधानसभा मतदारसंघाच्या विद्यमान आमदार पाच वर्षानंतर काल केज शहरांमध्ये फिरताना दिसल्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये केज शहरांमध्ये काल जसे स्वतः साठी प्रत्येक दुकानांमध्ये जाऊन मतं मागितली तशीच जर मते लोकसभेवेळी महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्या साठी का मागितले नाहीत अशी चर्चा सध्या होताना दिसत आहे लोकसभेच्या निवडणुकीमध्ये सत्ताधारी आमदार नमिता मुंदडा यांनी केज शहरांमध्ये एकाही व्यक्तीला पंकजा गोपीनाथ मुंडे यांना मतदान करा असे सांगितले नाही मग स्वतःची निवडणूक आली की घरोघरी जाऊन मते मागतात दिसतात त्यामुळे मुंडे समर्थकांमध्ये खूप नाराजगी दिसत आहे केज शहरामध्ये तर लोकसभेच्या निवडणुकी वेळी साधे बुत एजंट पण नव्हते तर मग लोकसभेची वेळी सत्ताधारी आमदार नमिता मुंदडा या काय करत होत्या कल के शहरांमध्ये पाइ प्रभात फेरी करण्यात आली होती त्यामध्ये मुंदडांचे स्वतःचेच कार्यकर्ते बोटावर मोजण्या इतके होते नमिता मुंदडा यांच्याकडून मित्र पक्षांना कुठेही विश्वासात घेतले जात नाही त्यामुळे मित्र पक्षांचे सर्व कार्यकर्ते नाराजगी व्यक्त करताना दिसत आहेत नमिता मुंदडा तुमचे कार्यकर्ते लोकसभेच्या वेळी तुतारीचे बुध एजंट होते आणि आता ते तुमच काम करताना दिसत आहेत त्यामुळे मुंडे परिवाराला मानणारे सर्वच लोक नमीता मुंदडा वर खूप नाराज आहेत म्हणून यावेळी नमीता मुंदडा यांना मतदान करतील का नाही हाच प्रश्न निर्माण झाला आहे.

# गोपाष्टमी महोत्सवाचे गोवर्धनगड येथे आयोजन

## कार्यक्रम: उपस्थित राहण्याचे आवाहन

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

गोवर्धनगड ( तालुका आष्टी ) येथे शनिवारी (दिनांक नऊ नोव्हेंबर ) गोपाष्टमी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. आष्टी तालुक्यातील लोखंड वाडी जवळ असलेल्या गोवर्धनगड येथे शनिवारी गोपाष्टमी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. देवळाली पाण्याची येथील चैतन्य गोशाळा यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे . सकाळी सहा वाजता चैतन्य गोशाळेपासून गोवर्धन गडापर्यंत दिंडी निघेल.

ही दिंडी गोवर्धन गडावर पोहोचल्यावर तेथे गोपूजन होईल. वृक्षारोपण करण्यात येईल . त्यानंतर सकाळी साडे दहा वाजता बबन महाराज बहीरवाल यांचे काल्याचे किर्तन होईल . त्याचप्रमाणे प्रज्ञाचक्षु ह भ प मुकुंदकाका जाटदेवळेकर हे देखील मार्गदर्शन करतील . या कार्यक्रमाच्या महाप्रसादाच्या यजमान शकुंतला ( अक्का) पाटील या आहेत. गोपाष्टमी कार्यक्रमास आष्टी तालुक्यातील विविध संत महंत उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन कार्यक्रमाचे संयोजक मंदारबुवा रामदासी यांनी केले आहे.

## निर्णय — ठेवीदार म्हणाले बँकात अडकलेले पैसे देणाऱ्याच्या पाठशी

# ...तर जनता त्यालाच मत देणार!



सुशिल टकले/गेवराई

सध्या निवडणुकीचे वातावरण तापलेले असून या तापलेल्या वातावरणात मल्टीस्टेट मध्ये आपल्या ठेवी ठेवून होरपळलेले ठेवीदार ही तापल्याचे चित्र निर्माण होत आहे. गेवराई तालुक्यातील ठेवीदारांची एकत्रित एक बैठक संपन्न झाली असून एक मुखाने जो उमेदवार ठेवीदारांच्या पैशाचा विचार करून मल्टीस्टेट वाल्या कडून पैसे काढण्याची हमी किंवा पैसे काढून देईल त्याच उमेदवाराला ठेविदार पाठिंबा देतील असा एकमुखी सूर निघाल्याचे माहिती आहे. ज्ञानराधा व साईराम या बँकांमध्ये पैसे अडकल्याने अनेक ठेवीदार अडचणीत आले असून अनेक गरीब ठेवीदारांचा यामध्ये नाहक बळी जात असल्याचे आपण अनेक वेळा ऐकले आहे. अनेक गरीब ठेवीदारांचे पैसे अडकल्यामुळे लग्न, शेती बाडी, घरदार असे व्यवहार अडकून पडले आहेत मात्र या बँकांच्या चेअरमन यांना व्हीआयपी ट्रीटमेंट जेलमध्ये मिळत असेल का? असा प्रश्न ठेवीदारांच्या मनात येतो चेअरमन यांना अटक झाली परंतु पैशाचे काय ? ठेवींचे काय ? याचं उत्तर अजूनही अनुत्तरीत आहे. अलीकडच्या काळात शहरातील अनेक बँका डबघाईला आलेल्या आहेत ठेवीदारांना पैसे देत नसून फक्त तारीख पे तारीख देण्यात येत आहे. बँकातून कसल्याही प्रकारचा व्यवहार होत नाही यामुळे बँक बुडण्या अगोदर विधानसभेच्या रिंगणामध्ये उतरलेल्या उमेदवाराने अनेक प्रश्न हाती घेतले आहे परंतु ठेवीदारांचा प्रश्न एकाही उमेदवाराने उचललेला नसून आपल्या जाहीरनाम्यामध्ये नसून व आपल्या भाषणांमधून एकाही उमेदवाराने ठेवीदारांचा प्रश्न समोर आणलेला नाही. यामुळे ठेवीदारांमध्ये नाराजी असून जो उमेदवार ठेविदारांच बोलेल तोच उमेदवार ठेवीदारांचे मतदान घेईल असा एक सूर या बैठकीमधून आला असून आता विधानसभेच्या आखाड्यामध्ये उतरलेले कोण-कोण उमेदवार या प्रश्नाकडे लक्ष देतात की कानाडोळा करतात हे पाहणे औचित्याचे ठरणार आहे.

# केज पंचायत समितीत भ्रष्टाचार!

## चर्चा: कोणी-कोणी मारला डल्ला




केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज पंचायत समितीच्या बीडीओ दिवाने मॅडमनी केज पंचायत समिती मध्ये भरमसाठ भ्राष्ठचार केला असल्याची चर्चा नागरिकांन मध्ये होताना दिसत आहे.बीडीओ दिवाने मॅडमनी वयक्तीक लाभा पासुन ते छोट्या छोट्या कामात भ्राष्ठचार करत आहेत व नंतर चोरांच्या उलट्या बोंबा या म्हणी प्रमाणे म्हणतात पंचायत समिती मध्ये भ्राष्ठचार केला जात नाही मग एमआरजिएस कामात तसेच पंचायत समिती बांधकाम विभाग कामात तसेच वयक्तीक लाभात एखाद्या कामाची रक्कम मिळण्यासाठी पैसे घेतले जातात मग भ्राष्ठचार नाही तर भ्राचाराचा बाप आहे हे केज पंचायत समितीच्या बीडीओ दिवाने मॅडमनी जनतेला उत्तर द्यावे असे नागरिकांतून बोलले जात आहे व भ्राष्ठचार होत नाही कशावरून छोट्या, मोठ्या कामासाठी पंचायत समिती मधील दोन भुरटे ग्रामसेवक पैसे घेतात मग तसेच बीडीओ दिवाने मॅडमचा सुध्दा हात असणार यात शंका नाही मग केज पंचायत समिती मध्ये बीडीओची , दोन ग्रामसेवक भरमसाठ भ्राष्ठचार करत आहेत यावर सीओ साहेब यांनी तात्काळ कार्यवाही करावी अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे नागरिकांन मधुन भावना व्यक्त केल्या जात आहेत.

# पहिली विश्वसुंदरी किकी हॅकन्सन यांचे निधन



**वॉशिंग्टन :** पहिली विश्वसुंदरी ठरलेल्या किकी हॅकन्सन यांचे वयाच्या ९५ व्या वर्षी निधन झाले आहे. कॅलिफोर्निया येथील त्यांच्या निवासस्थानी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. १९५१ मध्ये किकी हॅकन्सन यांच्या डोक्यावर विश्वसुंदरी या बिरुदाचा मुकुट ठेवण्यात आला होता. जगातल्या पहिल्या विश्वसुंदरीने आज जगाचा निरोप घेतला आहे.

किकी हॅकन्सन यांचा मृत्यू झोपेतच झाला. त्या त्यांच्या कॅलिफोर्निया येथील घरी होत्या. त्यांच्या कुटुंबाने सांगितले की, किकी हॅकन्सन यांना ४ नोव्हेंबरच्या रात्री झोपेत असतानाच देवाज्ञा झाली. त्यांच्या मृत्यूची घोषणा इन्स्टाग्राम अकाऊंटवरून करण्यात आली आहे. स्वीडनमध्ये जन्मलेल्या किकी हॅकन्सन यांनी १९५१मध्ये लंडनमध्ये झालेल्या पहिल्या मिस वर्ल्ड स्पर्धेत मिस वर्ल्डचा ताज जिंकत इतिहास घडवला. किकी हॅकन्सन यांनी जिंकलेल्या मिस वर्ल्ड या किताबामुळे या पुरस्काराची परंपरा जगात सुरू झाली.

# प्राणी संग्रहालयातील सर्वात मोठ्या मगरीचा मृत्यू

## मगरीचे वय १२० वर्षे

वृत्तसंस्था...

**कॅनबेरा :** प्राणी संग्रहालयात असणाऱ्या सर्वात मोठ्या मगरीचा आता मृत्यू झाला आहे. कॅसियस नावाची ही मगर ऑक्टोबरच्या मध्यास आजारी पडली होती आणि नुकताच तिचा मृत्यू झाला. या मगरीची लांबी तब्बल १७ फूट ११.७५ इंच म्हणजेच ५.४८ मीटर इतकी होती. मृत्यूवेळी तिचे वय १२० वर्षांपेक्षाही अधिक होते, असे सांगितले जाते.


या खाऱ्या पाण्यातील मगरीला १९८४ मध्ये पकडण्यात आले होते. त्यावेळी तिने जनावरे आणि नावांवर हल्ले करण्यास सुरुवात केली होती व एका मोहिमेत तिला पकडण्यात आले. ती ज्या प्रजातीची आहे, त्यामध्ये मगरींची लांबी २३ फुटांपर्यंतही वाढते. २०११ मध्ये लोलोंग नावाची एक खाऱ्या पाण्यातील मगर पकडण्यात आली होती व तिची लांबी २० फूट होती. ही मगर २०१३ मध्ये मृत्युमुखी पडली. कॅसिअस मगरीची २०११ मध्ये जगातील सर्वात मोठी (मानवी ताब्यातील) मगर अशी नोंद करण्यात आली होती.

# मंगळावर दिसला सूर्यग्रहणासारखा नजारा!

वृत्तसंस्था

**वॉशिंग्टन :** पृथ्वीच्या शेजारचा लाल ग्रह मंगळावर नासाचे अनेक रोव्हर फिरत आहेत. त्यांच्या कॅमेऱ्याने टिपलेली मंगळाची अनेक छायाचित्रे लोकांचे लक्ष वेधून घेतात. यापैकीच एक रोव्हर असलेल्या पर्सिव्हरन्सने मंगळावरील सूर्यग्रहणाचे व्हिडिओ चित्रण केले आहेत. ज्यावेळी मंगळाचा चंद्र फोबोस सूर्यासमोरून जात होता, त्यावेळी एखाद्या कार्टूनच्या गुगली डोळ्यांसारखे चित्र निर्माण झाले. जणूकाही हा डोळा खाली पाहत मंगळभूमीवर नजर ठेवत असावा,

## पर्सिव्हरन्सने सूर्यग्रहणाचे व्हिडिओ चित्रण केले



असे दिसले! या व्हिडिओत बटाट्याच्या आकाराचा मंगळाचा चंद्र हा सूर्य आणि मंगळाच्यामधून जात एकाक्षणी सरळ रेषेत आला. त्यामुळे सूर्याच्या तबकडीचा एक हिस्सा झाकोळला गेला. पर्सिव्हरन्स रोव्हरने मंगळावर मिशनच्या १२८५ व्या दिवशी म्हणजेच ३० सप्टेंबरला आपल्या मास्टकॅम- झेड कॅमेऱ्याने हे दृश्य टिपून घेतले. पर्सिव्हरन्सच्या एक्स हँडलवरून हा व्हिडिओ शेअर करण्यात आला आहे.

# सौदी अरेबियात प्रथमच झाली चक्क बर्फवृष्टी!

## वाळवंटातील वाळूवर पाहायला मिळाला बर्फाचा थर

वृत्तसंस्था

**रियाध :** सहारा वाळवंटाच्या मोरोक्को, अल्जेरियासारख्या देशांमधील भागात सप्टेंबरच्या अखेरीस मुसळधार पाऊस होऊन गेल्या अर्धशतकापासून कोरडी असलेली तळी भरली होती. सहाराच्या काही भागात हिमवृष्टी झाल्याच्या घटनाही यापूर्वी घडलेल्या आहेत. केवळ सहारा वाळवंटातच नव्हे, तर जगाच्या अन्य भागांतही निसर्गाचे अनोखे रूप पाहायला मिळत आहे. आता सौदी अरेबियाच्या इतिहासात प्रथमच चक्क बर्फवृष्टी झाली आहे. सौदी अरेबियातील वाळवंटातील काही भागांत पाऊस आणि बर्फवृष्टी पाहायला मिळाली. त्यामुळे पहिल्यांदाच वाळवंटातील वाळूवर बर्फाचा थर पाहायला मिळाला आहे. सौदी अरेबियाच्या वाळवंटी भागातील अल ज्वाफमध्ये हा प्रकार घडला.

सौदी अरेबियाच्या वाळवंटी प्रदेशात प्रचंड बर्फवृष्टी झाली आणि असे हे पहिल्यांदाच घडले आहे. म्हणजे ज्या पर्वतीय वाळवंटी भागात आतापर्यंत एकदाही बर्फवृष्टी किंवा गारपीट झाल्याची नोंद नाही, तिथे आता बर्फाची चादर पसरली आहे.

# छठ पूजेनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दिल्या शुभेच्छा!

वृत्तसंस्था



**नवी दिल्ली :** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना छठ पूजेनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. आपल्या शुभेच्छा संदेशात राष्ट्रपतींनी म्हटले आहे, श्रद्धा, उपवास आणि भक्तीने साजरी होत असलेल्या छठ पूजेच्या पवित्र प्रसंगी मी देशवासियांचे हार्दिक अभिनंदन करते आणि माझ्या शुभेच्छा देते. छठ पूजेचा सण देशातील सर्वात जुन्या सणांपैकी एक असून त्यामध्ये सूर्याचे पूजन केले जाते. निसर्गाकडून मिळणारी अनमोल भेट असलेल्या नद्या आणि तलाव यामधील पाण्याची या सणाच्या दिवशी पूजा करण्याचा प्रघात आहे.

'कडक उपवासामुळे हा सण आपल्या मनाचे शुद्धीकरण करतो.' पर्यावरणाचे संरक्षण आणि जतन करण्याची प्रेरणा आपल्याला हा सण देतो. निसर्गाचा अखंड देणारा हात सर्वांच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे, त्यामुळे छठ पूजेच्या निमित्ताने आपली सूर्य, नद्या आणि संपूर्ण निसर्ग यांच्याविषयी असलेली श्रद्धा दृढ करूया. हा सण आपल्या सर्वांच्या जीवनात आनंद घेऊन येवो आणि निसर्गाविषयी असलेली आपली श्रद्धा सातत्याने वृद्धिंगत होवो.

# रणथंबोर राष्ट्रीय उद्यानातून वर्षभरात २५ वाघ बेपत्ता

देशोन्नती वृत्तसंकलन

**सवाई माधोपूर :** राजस्थानच्या सवाई माधोपूर येथील रणथंबोर राष्ट्रीय उद्यानातून गेल्या वर्षभरात २५ वाघ बेपत्ता झालेत. या अभयारण्यात ७५ वाघ होते त्यापैकी २५ वाघ बेपत्ता झाल्यामुळे एकच गोंधळ उडाला आहे. एका वर्षात एवढ्या मोठ्या संख्येने वाघ बेपत्ता झाल्याचा अधिकृत अहवाल येण्याची ही पहिलीच वेळ आहे. या बेपत्ता वाघांना शोधण्यासाठी ३ सदस्यीय तपास पथक तयार करण्यात आले आहे. हे पथक २ महिन्यात मुख्य वन्यजीव कार्याला सादर करणार आहे. रणथंबोरमधून वर्षभरात २५ वाघ बेपत्ता झाल्याच्या वृत्ताने वनविभागाच्या अधिकाऱ्यांना धक्का बसला आहे. वाघ बेपत्ता झाल्याची बातमी विभागीय व्याघ्र निरीक्षण अहवालातून समोर आली आहे. याप्रकरणी



प्रधान मुख्य वनसंरक्षक पी.के. उपाध्याय यांनी उच्चस्तरीय चौकशी समिती स्थापन केली असून, ही चौकशी समिती रणथंबोरमधून बेपत्ता झालेल्या वाघांचा अहवाल दोन महिन्यांत सादर करणार आहे. पवनकुमार उपाध्याय यांनी चौकशी समिती स्थापन केली आहे. यात अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक टी मोहनराज जयपूर आणि मानससिंग यांची चौकशी समितीचे सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.



# मतदानासाठी सुट्टी न दिल्यास आस्थापनांवर कारवाई होणार

# मतदानासाठी सुट्टी बंधनकारक

**मुंबई :** मुंबई शहर व उपनगरातील सर्व व्यवसाय, व्यापार, उद्योग समूह, महामंडळे, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम तसेच इतर आस्थापनांमध्ये कार्यरत कामगार, कर्मचारी तसेच अधिकाऱ्यांना निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी २० नोव्हेंबर रोजी सुट्टी देणे बंधनकारक करण्यात आले आहे. या नियमांचे पालन न करणाऱ्या आस्थापनांच्या मालकांविरोधात कडक कारवाई केली जाईल, असा इशारा जिल्हा निवडणूक अधिकारी तसेच महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिला. भारत निवडणूक आयोग तसेच मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्या सूचनांनुसार मुंबई शहर व उपनगरांत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी भूषण गगराणी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबविले जात आहेत. याच पार्श्वभूमीवर, मुंबई शहर आणि दोन्ही उपनगरांतील मतदारांना निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी विविध नियम जारी करण्यात आले आहेत. राज्याच्या विधानसभा निवडणुकीत मतदानाचा अधिकार असलेल्या प्रत्येक व्यक्तीला मतदानाच्या दिवशी सुट्टी देण्याबाबत गगराणी यांनी आदेश दिले आहेत. सर्व उद्योग समूह, महामंडळ, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना आदींना हा नियम लागू होणार आहे.

## वेतनात कपात करता येणार नाही

अपवादात्मक परिस्थितीत कामगार, कर्मचारी, अधिकारी आदींना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी पूर्ण दिवसाची सुट्टी देणे शक्य नसल्यास त्यांना किमान चार तासांची सवलत देता येईल. मात्र, अशा सवलत प्रकरणांमध्ये जिल्हा निवडणूक अधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील. दरम्यान, सुट्टीच्या बदल्यात संबंधित व्यक्तीच्या वेतनात कोणत्याही प्रकारची कपात करता येणार नाही. या नियमांचे किंवा तरतुदींचे कोणत्याही आस्थापनाच्या मालकांनी उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे.

# महाराष्ट्रासह झारखंडमधून 558 कोटी रुपये रोकड; प्रलोभनपर वस्तू, मद्य जप्त



वृत्तसंस्था

**नवी दिल्ली :** महाराष्ट्र आणि झारखंडमधील निवडणुका तसेच पोटनिवडणुकांमध्ये मतदारांना प्रलोभन देण्याची प्रकरणे रोखण्याच्या उद्देशाने निवडणूक आयोगाच्या अखत्यारितील यंत्रणांनी केलेल्या कारवाईत आत्तापर्यंत ५५८ कोटी रुपये मूल्यांची रोकड, मोफत वाटपासाठी आणलेल्या प्रलोभनपर वस्तू, मद्य, अंमली पदार्थ आणि मौल्यवान धातू जप्त केले आहेत. निवडणुका जाहीर झाल्यापासून केवळ महाराष्ट्र राज्यात केलेल्या कारवाई अंतर्गत सुमारे २८० कोटी रुपये मूल्याचा माल जप्त केला गेला आहे. तर झारखंडमधूनही आतापर्यंत आणखी १५८ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दोन्ही राज्यांमध्ये यंदा होत असलेल्या निवडणुकांमध्ये २०१९ च्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत एकत्रित जप्तीचे प्रमाण ३.५ पटीने वाढले आहे, २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात १०३.६१ कोटी रुपये मूल्याचा मुद्देमाल तर झारखंडमध्ये १८.७६ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला गेला होता.

# कलम 370 संदर्भातील ठरावावरून उद्भवला वाद

वृत्तसंस्था

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीर विधानसभेत आज गुरुवारी ३७० कलमाच्या पुनरूज्जीवनासंदर्भातील ठरावावरून सत्ताधारी आणि विरोधी आमदारांमध्ये हाणामारी झाली. त्यामुळे सभागृहात एकच गोंधळ आणि तणाव निर्माण झाल्यामुळे विधानसभेचे कामकाज तहकूब करावे लागले. विधानसभेचे कामकाज सुरू होताच बारामुल्लाचे खासदार इंजिनीयर रशीद यांचे बंधू, आमदार खुर्शीद अहमद शेख यांनी कलम ३७० वर बॅनर सभागृहात दाखवले. त्यावर विरोधी पक्षनेते सुनील शर्मा यांनी तीव्र आक्षेप घेतला. सत्ताधारी-विरोधी आमदारांमध्ये हाणामारी झाली. सभागृहात काही काळ प्रचंड तणाव निर्माण झाला.

## जम्मू-काश्मीरविधानसभेत हाणामारी



सभागृहाचे कामकाज काही काळासाठी तहकूब करण्यात आले. सोमवारी ४ नोव्हेंबर रोजीदेखील विधानसभा अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राज्याला विशेष दर्जा बहाल करणारे कलम ३७० पुनर्संचयित करण्याचा प्रस्ताव 'पीडीपीच्या आमदार वाहिद पारा यांना मांडला होता. या प्रस्तावाला भाजपच्या आमदारांनी तीव्र निषेध केला होता. यानंतर विधानसभेत प्रचंड गदारोळ झाला होता. जम्मू-काश्मीर विधानसभेत पीडीपीचे आमदार वाहिद पारा यांनी कलम ३७० मागे घेण्याचा प्रस्ताव मांडला. जम्मू-काश्मीरला पुन्हा एकदा विशेष राज्याचा दर्जा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. विधानसभेत या प्रस्तावावरून भाजप आणि पीडीपी आमदारांमध्ये जोरदार वादावादी झाली होती. त्यानंतर गुरुवारी खुर्शीद अहमद शेख यांनी कलम ३७० वर बॅनर सभागृहात दाखवले. त्यावर विरोधी पक्षनेते सुनील शर्मा यांनी तीव्र आक्षेप घेतला. सत्ताधारी-विरोधी आमदारांमध्ये हाणामारी झाली. सभागृहात काही काळ प्रचंड तणाव निर्माण झाला. सभागृहात गोंधळ घालणाऱ्या काही विरोधी आमदारांना मार्शल्सनी ताब्यात घेतले. दरम्यान, विरोधकांनी विधानसभा अध्यक्षांवर भेदभाव केल्याचा आरोप केला.

# यूएनमध्ये पाकिस्तानला सुनावले खडे बोल

**संयुक्त राष्ट्रसंघ :** संयुक्त राष्ट्रसंघात बुधवारी भारताने पाकिस्तानला चांगलेच सुनावले आहे. पाकिस्तानला यावेळी भारत सरकारच्या अधिकाऱ्याने नव्हे तर विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसच्या खासदाराने प्रत्युत्तर दिले आहे. काँग्रेस नेते राजीव शुक्ला यांनी संयुक्त राष्ट्रसंघात काश्मीरचा मुद्दा अनावश्यक स्वरुपात उपस्थित केल्याप्रकरणी पाकिस्तानला फटकारले आहे. पाकिस्तानचे शिष्टमंडळ वारंवार काश्मीरचा मुद्दा उपस्थित करते आणि चुकीची माहिती फैलावते, प्रत्यक्षात वस्तुस्थिती खूपच वेगळी असल्याचे राजीव शुक्ला यांनी संयुक्त राष्ट्रसंघाला संबोधित करताना म्हटले आहे.

# कॅनडामधील 'त्या' मंदिरातील पुजाऱ्याला हटवले

## हिंसाचाराला खतपाणी घातल्याचा ठपका

वृत्तसंस्था

**कॅनडा :** कॅनडातील एका हिंदू मंदिरात रविवार, ३ नोव्हेंबर रोजी खलिस्तानवाद्यांनी भाविकांना मारहाण केली होती. या संतापजनक घटनेनंतर प्रक्षोभक विधान करून दोन समाजात तेढ निर्माण केल्याप्रकरणी मंदिराचे पुजारी रजिंदर प्रसा यांना हटविण्यात आले असल्याचे मंदिर प्रशासनाने स्पष्ट केले आहे. ब्रॅम्प्टनचे महापौर पॅट्रिक ब्राउन यांनी पुजाऱ्याविरुद्ध मंदिर मंडळाच्या कारवाईचे वृत्त सोशल मीडियावर शेअर केले आहे.

ब्रॅम्प्टनमधील हिंदू सभा मंदिर संकुलात खलिस्तानी अतिरेक्यांनी हिंदू-कॅनेडियन भाविकांवर हल्ला केला होता. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. यामध्ये हल्लेखोर खलिस्तान समर्थनाच्या घोषणा देत हिंदू भाविकांवर हल्ला करताना दिसले. यानंतर मंदिराच्या पुजाऱ्यांनी प्रक्षोभक विधान सोशल मीडियावर केले. याची गंभीर दखल हिंदू सभा मंदिराचे अध्यक्ष मधुसूदन लामा यांनी घेतली. हिंसाचाराला खतपाणी घालणारे विधान करणाऱ्या पुजाऱ्याला हटविण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.



**नागपूर :** राज्यातील विधानसभा निवडणुकींच्या पार्श्वभूमीवर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी बुधवारी नागपूर दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी नागपुरातील जगप्रसिद्ध दीक्षाभूमीला भेट दिली. तसेच तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केले.

# पहिल्याच वर्षी ट्रम्प करणार भारताचा दौरा

वृत्तसंस्था

**मुंबई :** जागतिक महासत्ता असलेल्या अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक पार पडली. यामध्ये रिपब्लिकन उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांनी विजय मिळवला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्रम्प यांना शुभेच्छा दिल्या आहेत. आता भारतासाठी एक महत्त्वाची बातमी समोर येत आहे. ती म्हणजे ट्रम्प हे राष्ट्रध्यक्ष पदाची शपथ घेतल्यानंतर भारताचा दौरा करणार आहेत.

पुढील वर्षी ऑगस्ट २०२५ मध्ये भारतात क्वॉड देशांची परिषद होणार आहे. अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जपान, व भारत या देशांचे हे संघटन आहे. या देशांच्या प्रमुखांची बैठक या

## भारतात होणार 'क्वॉड' देशांची परिषद

परिषदेवेळी असते. त्याचे आयोजन पुढील वर्षी भारतात होणार आहे. या परिषदेसाठी ट्रम्प हे भारतात येणार असून शपथ घेतल्यानंतर पहिल्याच वर्षी ते भारताचा दौरा करणार आहेत. असे करणारे ते अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष ठरणार आहेत. यापूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांनी २०२० मध्ये भारताचा दौरा केला होता. त्यांच्या सत्ताकाळाचे ते शेवटचे वर्ष होते. त्यावेळी भारतामध्ये अभूतपूर्व असे स्वागत झाले होते. पंतप्रधान मोदी यांनी यासाठी विशेष परिश्रम घेतले होते.

# पीएम विद्यालक्ष्मी योजनेला मंजुरी

**नवी दिल्ली :** गरीब होतकरू विद्यार्थ्यांना आता उच्च शिक्षणासाठी पैशाची चिंता करावी लागणार नाही. गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना त्यांचे भविष्य घडविण्यासाठी पंतप्रधान विद्यालक्ष्मी योजनेंतर्गत १० लाखांपर्यंत कर्ज देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. विद्यार्थी हे कर्ज कोणत्याही गॅरेंटरशिवाय कोणत्याही बँकेतून घेऊ शकतील. या कर्जावर त्यांना

## उच्च शिक्षणासाठी कर्ज घेणे होणार सुलभ

फक्त ३ टक्के व्याज द्यावे लागणार आहे. देशातील २२ लाख होतकरू विद्यार्थी दरवर्षी या योजनेचा लाभ घेऊ शकतील.

केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, केंद्र सरकारने गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी पंतप्रधान विद्यालक्ष्मी योजना आणली आहे. या योजनेला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.

# श्री ठाणेदार यांचा पुन्हा विजय

**मिचिगन :** बेळगावचे सुपुत्र असणारे आणि आता अमेरिकेत स्थायिक झालेले श्री ठाणेदार यांच्या अमेरिकेच्या प्रतिनिधीगृहाच्या निवडणुकीत सलग दुसऱ्यांदा विजय झाला आहे. अमेरिकेतील मिचिगन प्रांताच्या १३ व्या जिल्ह्यातून ते डेमॉक्रेटिक पक्षाचे उमेदवार म्हणून यशस्वी झाले आहेत. त्यांनी त्यांचे रिपब्लिकन पक्षाचे प्रतिस्पर्धी मार्टेल बिविंग्ज यांचा ३५ टक्क्यांपेक्षा अधिक मतांचे अंतर राखून मोठा विजय मिळविला आहे.

# माथेरानच्या डोंगरात पुन्हा घुमली राणीची शीळ

वृत्तसंस्था

**कर्जत :** तब्बल ५ महिने बंद असलेली माथेरानची राणी बुधवारपासून (६ नोव्हेंबर) पुन्हा धावू लागली आणि पर्यटकांचा उत्साह शिगेला पोहोचला. नेरळमधून निघालेली पहिली मिनी ट्रेन फुलांनी सजवून माथेरानला रवाना झाली. या ट्रेनला पर्यटकांनाही हाऊसफुल्ल प्रतिसाद झाला. आता मिनी ट्रेन पुन्हा रुळावर आल्यामुळे पर्यटक खूश झाले आहेत तर व्यावसायिकांचाही आनंद द्विगुणित झाला आहे.

नेरळमधून पहिली माथेरान ट्रेन सकाळी ८ वाजून ५० मिनिटांनी निघाली. मात्र, पहिल्या गाडीतून प्रवास करण्यासाठी ८ वाजल्यापासूनच पर्यटकांच्या रांगा लागल्या होत्या. त्यानंतर काही वेळातच माथेरानच्या डोंगरमाथ्यावर माथेरानच्या राणाची शीळ घुमू लागली. समुद्रसपाटीपासून ८०० मीटर उंचावर सह्याद्रीच्या माथ्यावर माथेरान हिल स्टेशन आहे.

## पर्यटकांचा उत्साह शिगेला

माथेरानच्या राणीची सफर करायला मिळणार या कल्पनेने पर्यटकांचा उत्साह शिगेला पोहोचला होता. त्यामुळे पहिल्या ट्रेनची एकूण १११ तिकिटे लगेचच संपली. त्यातील दुसऱ्या वर्गाची ९० तिकिटे आणि पहिल्या वर्गाची २१ तिकिटे काही क्षणांत संपली. त्यानंतर पर्यटकांची सकाळी १० वाजून २५ मिनिटांनी सुटणाऱ्या मिनी ट्रेनसाठी रांगा लावल्या होत्या. यावेळी एनडीएम ४०५ हे इंजिन ट्रेनला जोडून मोटरमन भानुदास ठाणगे, गार्ड सुनील पाटील, वरिष्ठ शाखा अभियंता संजीव कुमार, शाखा अभियंता, शरद सानप, उप स्टेशन मॅनेजर राहुल कुमार, दगडू आव्हाड डिझेल लोको शेड, मध्य रेल्वेचे कमर्चारी यांच्यासह स्टेशन व्यवस्थापक गुरुनाथ पाटील यांच्या हस्ते इंजिनची पूजा करून पाटील यांनी मिनी ट्रेनला झेंडा दाखवला.

## पर्यटकांचा उत्साह; मिनी ट्रेन हाऊसफुल्ल




२३३ - परळी विधानसभा मतदार संघ निवडणूक - २०२४
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार
HS_graphics-9623128222
२३३ - परळी विधानसभा मतदार संघ निवडणूक - २०२४
महाविकास आघाडी पुरस्कृत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे
अधिकृत उमेदवार
राजेसाहेब देशमुख
यांच्या प्रचारार्थ
मा.शरदचंद्रजी पवार साहेब
यांची
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार
जाहिर सभा
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार
लाखोंच्या संखेने उपस्थित रहा
शनिवार, दि.9 नोव्हेंबर 2024, दुपारी 1:00 वाजता । स्थळ - मोंढा मार्केट, परळी वै
सय्यद हनिफ उर्फ बहादुरभाई
शहराध्यक्ष
भारतीय काँग्रेस पार्टी
देवराव लुगडे महाराज
तालुकाध्यक्ष
राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष
ॲड.जिवनराव देशमुख
शहराध्यक्ष
राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष
भोजराज पालीवाल
तालुकाध्यक्ष
शिवसेना -उबाठा
राजेश विभुति
शहराध्यक्ष
शिवसेना -उबाठा
महाविकास आघाडी परळी वैजनाथ